# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **30/05/2022**

**Brief of the work done :-**

अवैध मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने अपहरणाच्या तीन गुन्ह्यातील अपहृत बालिका व आरोपींचा शोध घेऊन ताब्यात घेतले आहे.

### अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या अधिकाऱ्यांना यश

## अपहृत बालिका, आरोपींचा लागला शोध

**वाशीम** ब्युरो. वाशीम जिल्ह्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांतील मुलींचे शोध घेण्याकरिता सदरचे प्रकरणे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, वाशीम यांच्याकडे वर्ग करण्यात आलेले आहे. अशा तीन गुन्ह्यातील अपहृत गुन्ह्यातील बालिका व आरोपीचा शोध लावण्यास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यास यश आले आहे.

वाशीम शहर पोलिस स्टेशन येथील दाखल गुन्ह्यातील फिर्यादी गौतम गुलाब पैठणे रा. अकोला यांची अपहृत मुलगी हिला आरोपी शुभम अनिल गायकवाड रा. अकोट फैल अकोला याने मागील 4 वर्षांपूर्वी फुस लावून पळवून नेले होते. सदर पीडिता हिचे शोधाबाबत सर्वोत्तरी प्रयत्न करून मिळालेल्या माहिती वरून पीडिता हिचा शोध घेतला असता सदर पीडिता ही अकोट फैल अकोला येथे व आरोपी शुभम अनिल गायकवाड याचा शोध घेतला असता तो सुध्दा मिळून आल्याने त्यास अकोट फैल अकोला येथून ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच मानोरा पोलिस स्टेशनमध्ये दाखल गुन्ह्यातील फिर्यादी यादव महादा खंडारे रा. शेंदोणा यांची नात अपहृत मुलगी हिला आरोपी विक्की विठ्ठल दुमारे रा. शेंदोणा याने मागील 3 वर्षांपूर्वी फूस लावून पळवून नेले होते. सदर पीडिता हिचा शोध घेतला असता ती, जाधववाडी, ता. इंदापूर, जि. पुणे येथे मिळून आल्याने तिला ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच गुन्ह्यातील आरोपी हा रेडी शेतशिवारात ता. इंदापूर, जि. पुणे येथे मिळून आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच मालेगाव पोलिस स्टेशनमध्ये दाखल गुन्ह्यातील राधाबाई गुणाजी गाढवे रा. वारंगी यांची अपहृत मुलगी हिला आरोपी शुभम नारायण सरकडे रा. वारंगी याने फूस लावून पळवून नेले होते.

### पीडितेला पुण्यातून घेतले ताब्यात

सदर गुन्ह्यातील पीडिता ही माताळवाडी भूगाव, जि. पुणे येथे असल्याचे मिळालेल्या गुप्त बातमीवरून समजल्याने नमूद पीडिता हिचा सदर परिसरात शोध घेतला असता ती मिळून आल्याने तिला ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच गुन्ह्यातील आरोपी विक्की विठ्ठल सरकटे याचा सुध्दा शोध घेण्यात आला आहे. अशा प्रकारे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, वाशीम पथकास अनेक कालावधीपासून मिळून न आलेल्या अपहृत बालिका यांचा शोध घेण्यात यश मिळाले आहे. तसेच इतरही गुन्ह्यातील अद्यापही मिळून न आलेल्या अपहृत बालिका यांचा शोध घेण्याकरिता सर्वोत्तरी प्रयत्न करण्यात येत आहेत.